# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ८७ वा बुधवार दि.०४ सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## अतीवृष्टी आणि पुरग्रस्थांना शासनाने तातडीने मदत करावी नांदेड, हिंगोली जिल्हयातील आपातग्रस्थ भागाची पाहणी केल्या नंतर माजी मंत्री आ अमित देशमुख यांची मागणी

हिंगोली / प्रतिनिधी : – अतिवृष्टी आणि नंतर आलेल्या पुरामुळे मराठवाड्यात उभ्या शेती पिकाचे आणि जमिनीचे मोठे नुकसान झाले आहे. प्रशासनाने या नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत, शासनाने आपतग्रस्तांना दिलासा देण्यासाठी मदत जाहीर करावी, अशी मागणी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी नांदेड, हिगोली जिल्हयात अनेक ठिकाणी अतीवृष्टी आणि पूरग्रस्थ भागाच्या पाहणी नंतर केली. मागच्या तीन–चार दिवसात झालेल्या अतिवृष्टीमुळे मराठवाड्यात शेती पीकाचे मोठे नुकसान झाले आहे. चांगल्या भरात असलेले सोयाबीन, काढणीस आलेला मुग, उडीद, तसेच तुर, हायब्रीड ज्वारी ऊस, केळी यासह इतर शेती पीकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. काही ठिकाणी माती वाहून गेल्याने जमीन नापीक बनली आहे. अतीवृष्टीने नंतर आलेल्या पुरामुळे अनेक शहरात व गावात पाणी घुसल्याने घराची पडझड झाली आहे. जीवनावश्यक वस्तुची नासाडी झाली आहे. अनेक परीवारांच्यास समोर उपजीवीकेचा प्रश्न निर्माण झाला आहे. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज दुपारी आमदार मोहन हंबर्डे तसेच काँग्रेस पदाधिकारी यांच्यासह नांदेड शहरातील पाकीजा नगर, बिलाल नगर, लक्ष्मी नगर, गौतम नगर, खडकपुरा भागात जाऊन , गोदावरीचे पाणी वस्तीत घुसून झालेल्या नुकसानीची पाहणी केली, अपतग्रस्तांशी संवाद साधला, त्यांना धीर दिला, प्रशासनाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करावेत, अशा सूचना दिल्या. अपदग्रस्तांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला असे आश्वासन दिले. यावेळी नांदेड वाघाळा महानगरपालिकेचे आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मिर्झा फरदतुला बेग, नांदेड शहर काँग्रेसचे अध्यक्ष अब्दुल सत्तार, २१ शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास को–ऑपरेटिव बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, लोहा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शरद पवार, कंधार





तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बालाजी पंडागळे, राहुल हंबर्डे, विठ्ठल पावडे दिलीपराव पाटील बेटमोगरेकर, अण्णासाहेब पवार, सतीश देशमुख, पप्पू कोंडेकर, तिरुपती कोंडेकर आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. त्यानंर माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी हिंगोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे प्रभारी सचिन नाईक, हिंगोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दिलीपराव देसाई यांच्यासह हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यात डोंगरगाव (पूल) येथे जाऊन शेती पिकाची तसेच, पुराने नुकसान झालेल्या घरांची पाहणी केली. कळमनुरी तालुक्यातील डोंगरगाव (पूल) येथील निलाबाई बरगे यांच्या घरामध्ये पुराचे पाणी जाऊन मोठे नुकसान झाले. त्यांच्याशी व इतर सर्व नागरिकांशी आमदार देशमुख यांनी संवाद साधून त्यांना धीर दिला.

नुकसानग्रस्ताच्या सोबत काँग्रेस पक्ष कायम उभा आहे अशी ग्वाही दिली. यावेळी कळमनुरीच्या नायब तहसीलदार डॉक्टर सीमा कांदे मंडळ अधिकारी शिल्पा सरकटे तलाठी विनोद ठाकरे वसमत तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाराम खराटे शहराध्यक्ष अलीमुद्दीन शेख डोंगरगावचे सरपंच अभिजीत देशमुख एम.आर कॅतमवार, सुधीर सराफ सुरेश कांडलीकर, जे.के कुरेशी आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. माजी मंत्री आमदार देशमुख यांनी माजी आमदार भाऊराव पाटील व काँग्रेस पदाधिकारी यांच्यासह हिंगोली नजीकच्या आझम कॉलनी तसेच सेनगाव तालुक्यातील हनागदरी येथे भेट देऊन अतीवृष्टीने नुकसान झालेली पाहणी केली, नागरीकांशी संवाद सांधला.

## बाभळगाव येथे पारंपारिक पद्धतीने बैलपोळा साजरा



बाभळगाव येथे पारंपारिक पद्धतीने बैलपूजन करुन पोळा सण साजरा करण्यात आला. बैलपोळ्यानिमित्त विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशालीताई विलासराव देशमुख, आमदार धिरज विलासराव देशमुख व सौ. दीपशिखा धिरज देशमुख यांनी बैलांची पूजा केली. यावेळी संतोष देशमुख, शामराव देशमुख, गोविंद देशमुख, श्रीकृष्ण पिटले आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## कोल्हापूरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडिअम उभारणार : उपमुख्यमंत्री पवार

मुंबई : कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यांतील क्रिकेट खेळाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने कोल्हापूर जिल्ह्याच्या करवीर तालुक्यातील विकासवाडी गावाच्या परिसरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम उभारण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ताब्यात असलेल्या ४२१ हेक्टर जागेपैकी १२ हेक्टर जागा क्रीडा विभागाला उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले. या जागेवर स्टेडिअम उभारण्यासाठी लागणारा खर्च कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन करणार असून क्रीडा विभागाने त्यांच्याशी करार करावा असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनला क्रीडांगण उभारण्यासाठी जागा हस्तांतरित करण्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या समिती कक्षात बैठक घेतली. बैठकीस वैद्यकीय शिक्षण मंत्री तथा कोल्हापूरचे पालकमंत्री हसन मुश्रीफ, उद्योग मंत्री उदय सामंत, माजी खासदार तथा कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावर होणा–या विविध स्पर्धांमुळे शहरी भागासह ग्रामीण परिसरात देखील क्रीडा क्षेत्राला वलय प्राप्त होऊ लागले आहे.

## अशोक हनवते यांना पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये शिवरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल बी एल, के डी, एस आय,राजू, नागू यांनी पेढे वाटून केला सत्कार

लातूर :– अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, जिल्हा शाखा लातूर यांना पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल शिवरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल के डी गायकवाड सेवानिवृत्त अधिकारी भूमी अभिलेख कार्यालय , बी एल कांबळे ग्रंथपाल, शासकीय ग्रंथालय जुने जिल्हाधिकारी कार्यालय लातूर ,एस आय गायकवाड सेवानिवृत्त अधिकारी भुमिअभिलेख ,राजू मस्के कॉन्ट्रॅक्टर , नागू कांबळे यांनी पुष्पगुच्छ, शाल, पेढे वाटून अति उत्साहात आनंदाने सत्कार केला.



## विधानसभा जिद्दीने लढायची आणि जिंकायचीच लातूर ग्रामीणच्या कार्यकर्त्यांनी कामाला लागावे

### केंद्रीय राज्यमंत्री ना. मुरलीधर मोहोळ यांचे भाजपा कार्यकर्त्यांना आवाहन

लातूर : – लोकसभा निवडणुकीचे निकाल ही एक चिंतेची बाब असली तरी या लोकसभेत महाविकास आघाडीपेक्षा केवळ अर्धा टक्का मते महायुतीला राज्यात कमी मिळाली. केंद्रात सत्ता आली मोदीजी पंतप्रधान झाले, सर्व सामान्य जनतेच्या हितासाठी विविध योजना सुरू करणाऱ्या महायुतीची सत्ता पुन्हा राज्यात येणार यात शंका घेण्याचे कारण नाही तेव्हा येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत जिद्दीने लढायचे आहे आणि जिंकायचेही आहे या मानसिकतेतून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आवाहन केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री ना. मुरलीधर अण्णा मोहोळ यांनी केले.

येणाऱ्या काळात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे पक्षपदाधिकारी, लोकप्रतिनिधी, प्रमुख कार्यकर्त्यांची संघटनात्मक बैठक लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात केंद्रीय राज्यमंत्री ना. मुरलीधरअण्णा मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी दुपारी झाली या बैठकीस भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड, जिल्हा समन्वयक प्रा. किरण पाटील, ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, जिपचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, भाजपा नेते राजेश कराड, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे यांच्यासह इतर मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी ना मोहोळ यांचे पांडुरंगाची मूर्ती देऊन आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून स्वागत केले.

राज्यात आपला मुख्यमंत्री नसला तरी मोठा भाऊ या भूमिकेतून काम करीत आहोत. येणाऱ्या विधानसभेची निवडणूक महायुतीच्या माध्यमातूनच लढणार असल्याचे सांगून ना. मुरलीधर मोहोळ म्हणाले की, बूथ प्रमुखाची मोठी जबाबदारी आहे. जुन्या नव्या कार्यकर्त्यांचा त्याचबरोबर लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी यांचा समन्वय साधून काम करावे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेमुळे महिलांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून केंद्र आणि राज्य शासनाचे कल्याणकारी निर्णय सोशल मीडियाच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचवावे अशा सूचना त्यांनी दिल्या. यावेळी ना. मोहोळ यांनी उपस्थित भाजपा पदाधिकाऱ्यांकडून मते जाणून घेतली आणि आगामी काळातील विधानसभा निवडणुकीची रणनीती काय असेल याबाबत मार्गदर्शन केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात गेल्या पंधरा–वीस वर्षात कार्यकर्त्यांच्या मेहनतीतून काँग्रेसचे अस्तित्व नष्ट करण्याचे काम केले असून या मतदारसंघातील ७० टक्के ग्रामपंचायती आजही भाजपच्या ताब्यात आहेत. या मतदार संघातील बहुतांशी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती जागेवर घवघवीत यश संपादन करून रेणापूर नगरपंचायतीवर भाजपाने झेंडा फडकला असे सांगून या बैठकीत बोलताना भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, केंद्र शासन आणि राज्यातील महायुती शासन यांच्या माध्यमातून मतदार संघातील गावागावात विकासाच्या विविध योजना राबविण्यात आल्या अनेक कामांना निधी मोठ्या प्रमाणात मिळवून दिला एकूणच मतदारसंघात कार्यकर्त्याची मजबूत फळी असून पक्षाचे चांगले संघटन उभे केले आहे. मागील विधानसभा निवडणुकीत






निवडून येणारी लातूर ग्रामीण ची जागा अचानकपणे शिवसेनेला दिली यावेळी भाजपाची असलेली जागा भाजपालाच ठेवून कार्यकर्त्यांना बळ आणि प्रोत्साहन द्यावे असे बोलून दाखविले.

भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख यांनी उपस्थित यांचे आभार मानले. प्रारंभी रेणापूर तालुकाध्यक्ष अँड. दशरथ सरवदे यांनी बैठकीचे प्रास्ताविकात मतदार संघाची संघटनात्मक बांधणी सांगून आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून झालेल्या विविध विकास कामांची माहिती दिली. बैठकीचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. या बैठकीस पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, जिल्हा सरचिटणीस तुकाराम गोरे, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, रेणापुरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, जिल्हा भाजपाचे हनुमंतबापू नागटिळक, सतीश आंबेकर, वैभव सापसोड, वसंत करमोडे, पद्माकर चिंचोलकर, राजकिरण साठे, सुरज शिंदे, अल्पसंख्यांक सेलचे रशीद पठाण, महिला आघाडीच्या ललिता कांबळे, लता भोसले, अनुसया फड, सुरेखा पुरी, शीला आचार्य, जणाबाई साखरे यांच्यासह लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे लोकप्रतिनिधी भाजपासह विविध आघाडी मोर्चाचे पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय....

# क्षमताधिष्ठित मूल्यमापन

देशातील विविध शाखांमध्ये शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम आणि त्यांची परीक्षा पद्धती याबाबत निर्णय घेणार्या 'राष्ट्रीय शैक्षणिक व संशोधन परीक्षा शिक्षण परिषदे'ने आता विद्यार्थ्यांच्या परीक्षा पद्धतीमध्ये महत्त्वाचा बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. घोकंपट्टीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गुण मिळवण्याच्या प्रक्रियेतून आता विद्यार्थ्यांची मुक्तता होणार असून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचे मूल्यमापन आता क्षमताधिष्ठित पद्धतीने केले जाणार आहे. या शिक्षण परिषदेकडून म्हणजेच 'एनसीईआरटी'कडून घेतल्या जाणार्या काही निर्णयांवर नेहमीच टीका करण्यात येत असली, तरी विद्यार्थ्यांचे या नव्या पद्धतीने मूल्यमापन करण्याचा एनसीईआरटीचा निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे. परीक्षार्थी म्हणून स्वतःची कारकीर्द घडवण्याकडे कल असणार्या विद्यार्थ्यांना आता खर्या अर्थाने ज्ञानार्थी होता येईल. आधुनिक जगामध्ये परीक्षांमध्ये मिळणारे गुण आज एखाद्या विद्यार्थ्याच्या ज्ञानाचा निकष असतो; पण अनेक वेळा हे गुण घोकंपट्टी पद्धतीनेच मिळवलेले असतात, हे वास्तवही नाकारून चालत नाही. तरी सध्याची परीक्षा पद्धती इतकी एडिटिंग टेबल झाली आहे की कोणते प्रश्न परीक्षेमध्ये विचारले जातील याची कल्पना आधीच विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना असते. त्या आधारे त्या प्रश्नांची उत्तरे पाठ करूनच विद्यार्थी उत्तरपत्रिकेवर उतरवत असतात. अर्थात, तो विषय त्या विद्यार्थ्याला किती कळला आहे याबाबत त्यामुळे नेहमीच संशय निर्माण होतो. मी किंवा बारावीच्या परीक्षेमध्ये ९० ते ९५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणार्या विद्यार्थ्यांची जर दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये पुन्हा एकदा परीक्षा घेण्यात आली, तर ते विद्यार्थी तेवढे गुण मिळवू शकत नाही असेसुद्धा अनेक वेळा सिद्ध झाले आहे. कारण, विद्यार्थी नेहमी परीक्षेत यश मिळवण्यासाठीच अभ्यास करत असतात. आपण जो विषय शिकत आहोत, त्याचा कितपत उपयोग भविष्यात होणार आहे याचा विचार कोणीच करत नाही. मध्यंतरी जेव्हा एक सर्व्हे करण्यात आला होता तेव्हा सातवी-आठवीतल्या मुलांना स्वतः चे नावही व्यवस्थित मराठीत लिहिता येत नाही आणि साधी बेरीज-वजाबाकीची गणितेसुद्धा करता येत नाहीत असे लक्षात आले होते. गणित विषयात पदवी मिळवलेला एखादा विद्यार्थी बँकेत जाऊन स्वतःच्या ज्ञानावर आधारित एखादे व्यावसायिक काम करू शकेल अशी खात्रीसुद्धा सध्या देता येत नाही किंवा अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेला एखादा विद्यार्थी त्या ज्ञानाच्या आधारे खरोखर एखादे काम उभारू शकेल याचीही खात्री देता येत नाही. शालेय पातळीवर जे ज्ञान सध्या दिले जात आहे त्याचा वापर फक्त परीक्षेत यश मिळवण्यासाठीच केला जात आहे. जो अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या समोर ठेवला जात आहे त्या अभ्यासक्रमावर आधारित कोणते प्रश्न येतील आणि त्याचे उत्तरे कशाप्रकारे लिहायची याची घोकंपट्टी वर्षभराच्या कालावधीमध्ये पूर्ण झाली की कोणताही विद्यार्थी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवू शकतो.अशा एखाद्या विषयामध्ये विद्यार्थ्याला ९० टक्के गुण मिळाले याचा अर्थ त्याला त्या विषयाचे ९० टक्के ज्ञान मिळाले, असा निष्कर्ष मात्र काढता येत नाही. आता एनसीईआरटीने परीक्षा पद्धतीमध्ये जो बदल करण्याचा निर्णय घेतला आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाच्या माध्यमातून किती क्षमता विकसित केली याचे निश्चित मूल्यमापन होणार आहे. विषय विद्यार्थ्यांना किती समजला आणि त्या विषयाचा सर्वसामान्य आयुष्यामध्ये त्याच्याकडून वापर केला जात आहे की नाही याची तपासणी आता या नवीन परीक्षा पद्धतीमुळे शक्य होणार आहे. जगभरातील शिक्षणतज्ज्ञ ज्या उपयोजित शिक्षणपद्धतीचा नेहमीच पाठपुरावा करत असतात ती उपयोजित शिक्षण पद्धती या निमित्ताने पुन्हा एकदा चर्चेला येईल. आपण जे शिक्षण घेणार आहोत त्याचा भविष्यात आपल्याला उपयोग व्हावा यात उपयोजित शिक्षण पद्धतीचा अर्थ असतो. पण अनेक वेळा दहावी किंवा बारावी पातळीपर्यंत जे शिक्षण घेतले जाते त्याचा किती वापर नंतरच्या कालावधीमध्ये सर्वसामान्य आयुष्य जगताना होतो हासुद्धा संशोधनाचा विषय असू शकतो. विद्यार्थ्यांना आगामी कालावधीमध्ये रोजगार देणारे, कौशल्यावर आधारित शिक्षण देणे काळाची गरज आहे. एनसीईआरटीने क्षमताधिष्ठित शिक्षण देण्याचा जो निर्णय घेतला आहे ती या कौशल्यावर आधारित शिक्षणाची पहिली पायरी आहे असेच म्हणावे लागेल. परीक्षेत मिळालेले गुण हे कोणत्याही विद्यार्थ्यांचे ज्ञानाचे योग्य मूल्यमापन नाही हे आता जगभरातील शिक्षण तज्ज्ञांनी मान्य केले आहे. एखाद्या विद्यार्थ्याला कमी गुण जरी मिळाले असले तरी त्याला त्या विषयाचे संपूर्ण ज्ञान असू शकते; पण त्या विषयांमध्ये शंभर टक्के गुण मिळवणार्याला तेवढे ज्ञान असेलच याची कोणतीही खात्री देता येत नाही. याच पार्श्वभूमीवर एनसीईआरटीने केलेल्या परीक्षा पद्धतीतील बदलाचे स्वागत करावे लागणार आहे. भविष्यामध्ये हमखास रोजगार देणारी क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे हे कोणत्याही शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट असते. विद्यार्थी केवळ परीक्षार्थी आणि गुणार्थी झाल्यामुळे या मूळ उद्देशालाच हरताळ फासला गेला होता. आता एनसीईआरटीच्या या नवीन मार्गदर्शक तत्त्वांमुळे परिस्थितीत बदल होईल आणि क्षणामध्ये विद्यार्थ्यांच्या क्षमता खरोखरच विकसित होतील, अशी आशा करावी लागेल.

# संकल्प विकसित भारताचा, पण

जागतिक बँकेकडून अलीकडेच प्रकाशित करण्यात आलेल्या एका अहवालाची सध्या सर्वत्र चर्चा आहे. यामध्ये असे म्हटले आहे की, अमेरिकेच्या दरडोई उत्पन्नाच्या एकचतुर्थांश पातळीपर्यंत पोहोचण्यासाठी भारताला ७५ वर्षे लागतील. २०४७ सालापर्यंत विकसित अर्थव्यवस्था बनण्याचा भारताचा संकल्प आहे. जागतिक बँकेच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या अहवालाच्या माध्यमातून हा संकल्प पूर्ण होणार की नाही अशी शंका निर्माण झाली आहे. जागतिक बँकेचा दावा आहे की हा अहवाल १०८ मध्यम-उत्पन्न असलेल्या अर्थव्यवस्थांच्या डेटावर आधारित आहे. या १०८ देशांत एकूण जागतिक लोकसंख्येच्या ७५ टक्के लोक आहेत आणि जागतिक जीडीपीमध्ये या देशांचा वाटा ४० टक्के आहे.या अहवालात भारत आणि इंडोनेशियाच्या औद्योगिक धोरणावर टीका करण्यात आली आहे.

असे म्हटले आहे की, अतिवृद्धीद्वारे झटपट श्रीमंत होण्याऐवजी त्यांनी दीर्घकालीन, संथ पण स्थिर वाढ करण्याचे लक्ष्य ठेवले पाहिजे. मध्यम-उत्पन्न देशांनी देशांतर्गत तंत्रज्ञानाचा विकास सोडून द्यावा आणि इतर देशांनी, विशेषत: विकसित देशांनी आणि त्यांच्या कंपन्यांनी विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा वापर करावा. कारण स्वतः चे तंत्रज्ञान विकसित करण्यात संसाधनांचा अपव्यय होईल, असेही सुचवण्यात आले आहे. मलेशिया आणि इंडोनेशियाप्रमाणे भारताने स्वत:चे तंत्रज्ञान विकसित करण्याचा प्रयत्न करू नये, असा इशारा यामध्ये देण्यात आला आहे. आश्चर्याची बाब म्हणजे भारताच्या अर्धसंवाहक धोरणावर आणि संरक्षण स्वावलंबन धोरणावरही टीका झाली आहे. 'द इकॉनॉमिस्ट' लिहिते की, भारताने ५०९ संरक्षण उत्पादनांच्या आयातीवर बंदी घातल्यानंतर भारत जगातील टॉप २५ संरक्षण निर्यातदारांच्या यादीतून बाहेर पडला आहे. सरकारी संरक्षण आणि भारतात नवीन (विदेशी) कंपन्यांच्या प्रवेशावरील निर्बंधांमुळे कार्यक्षम कंपन्याही कार्यक्षम राहू शकणार नाहीत, असे या अहवालात सांगण्यात आले आहे. अहवालात असे म्हटले आहे की, अमेरिकन कंपनी ४० वर्षांत आकाराने सरासरी सात पटीने वाढते, तर भारतात ती ङ्कक्त दुप्पट होते. सदर अहवालाचे निष्कर्ष बघता त्याच्या मुळाशी असणारी कारणे शोधणे गरजेचे आहे. भारत सरकारने टेस्ला इलेक्ट्रिक कार कंपनीच्या अटी धुडकावून लावल्याने आणि आयात शुल्कात संपूर्ण सूट देण्यास नकार दिल्याने जागतिक बँक संतप्त झाल्याचे दिसत आहे.




विशेष म्हणजे भारताचे ऑटोमोबाइल उद्योगजगात स्वतःचे स्थान असून देशातील ऑटोमोबाइल कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन सुरू केले आहे. ऑनलाइन व्यवहारांमध्ये भारत झपाट्याने आगेकूच करत आहे, याची कबुली अहवालातच देण्यात आली आहे. आज अनेक देश भारताची यूपीआय प्रणाली स्वीकारण्यास उत्सुक आहेत. भारताने हे तंत्रज्ञान विकसित केले असल्याने स्विफ्ट सारखी स्वतःची पेमेंटप्रणाली तयार करता आली. भारतात हे तंत्रज्ञान विकसित झाल्यानंतर व्हिसा आणि मास्टर कार्डसारख्या कंपन्या जवळपास बाजारातून निघून गेल्या आहेत. भारताने मित्र देशांकडून रुपयात तेल विकत घेण्यासारखे व्यवहार सुरू केले आहेत, जे अमेरिका आणि युरोपीय देशांना रुचलेले नाहीयेत. अंतराळ क्षेत्र हे आणखी एक उदाहरण आहे, जिथे भारताने आपले स्वदेशी तंत्रज्ञान विकसित केले आहे आणि पीएसएलव्ही आणि चांद्रयानसारखे प्रकल्प यशस्वीपणे लाँच केले. चांद्रयान तयार करून, भारत हा चंद्राच्या दक्षिण ध्रुवावरील गडद बाजूला पोहोचणारा पहिला देश बनला. ज्या उद्दिष्टासाठी अमेरिकेला १६६ अब्ज डॉलर्स खर्च करावे लागले, ते भारतीय शास्त्रज्ञांनी अवघ्या ६१५ कोटी रुपयांमध्ये पूर्ण केले. भारताने या देशांकडून अंतराळ क्षेत्रातील तंत्रज्ञानाची मागणी केली असता ती साङ्क नाकारण्यात आली होती. गेल्या काही वर्षांत भारताच्या संरक्षण निर्यातीत अनेक पटींनी वाढ झाली आहे. संरक्षण क्षेत्रातील भारताच्या वाढत्या भूमिकेबद्दल जागतिक बँकेला चिंता वाटणे साहजिक आहे. कारण त्यामुळे विकसित देशांची संरक्षण बाजारपेठ आता संकुचित होत आहे.

जागतिक बँक का विसरते की या सर्व तथाकथित 'चुका' असूनही, भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. याउलट विकसित देश गंभीर चलनवाढ आणि आकुंचन किंवा स्थिरतेतून जात आहेत. कोविडोत्तर काळात आणि रशिया-युक्रेन युद्धानंतर आज युरोपातील बहुतांश देश कर्जाच्या ओझ्याखाली दबले आहेत. याउलट भारत पेमेंट बॅलन्समधील तुटीतून बाहेर पडत आहे. पायाभूत सुविधांमध्ये सतत सुधारणा होत आहे, बौद्धिक संपदा सतत प्रगती करत आहे आणि पूर्वीपेक्षा कितीतरी पट अधिक पेटंट मंजूर केले जात आहेत. नवोन्मेषाला चालना देण्यासाठी केंद्रीय अर्थसंकल्पात १ लाख कोटी रुपयांचा निधी तयार करण्यात आला आहे. दारिद्र्यात घट झाली असून देशात कोट्यवधी बेघरांना घरे दिली जात आहेत. सरकारी मदत, वीज, पाणी, स्वच्छतागृहे, शिक्षण आणि आरोग्य सुविधांमुळे गरिबांच्या जीवनात बदल होत आहेत. या सर्वांबाबत संयुक्त राष्ट्रसंघाच्या संस्थांकडून भारताचे कौतुक केले जात आहे. जागतिक बँकेने हे लक्षात घेतले पाहिजे की, पर्चेसिंग पॉवर पॅरिटीच्या निकषावर भारताचे दरडोई उत्पन्न सद्यस्थितीत १० हजार डॉलरच्या वर पोहोचले आहे, जे अमेरिकेच्या दरडोई उत्पन्नाच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे उच्च उत्पन्नाचा देश होण्याचा भारताचा संकल्प हा पूर्ण होणार असल्याचीही शक्यता आहे. अनेक समीक्षकांचा असा विश्वास आहे की, जागतिक बँक भारताच्या विकासाच्या मार्गावर टीका करत असेल, तर भारत नक्कीच योग्य मार्गावर आहे. कारण यापूर्वीही विकसित देशांच्या सांगण्यावरून जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने अनेक अटी लादून भारताच्या मार्गात अडथळे आणण्याचा प्रयत्न केला होता. अहवालाच्या लेखकांना 'मध्यम उत्पन्नाच्या सापळ्या'च्या नावाखाली त्यांचे युक्तिवाद बरोबर सिद्ध करावे लागतील. त्यांनी हे जाणून घेतले पाहिजे की आत्मनिर्भर भारताची जी रणनीती अवलंबली जात आहे ती जागतिक बँकेच्या निरर्थक तत्त्वांवर आधारित नाही, तर भूतकाळातून घेतलेल्या धड्यांचा आणि जागतिकीकरणाच्या आंधळ्या मार्गाने देशांतर्गत उद्योग उद्ध्वस्त झाल्याचा परिणाम आहे. जागतिक बँकेचा अहवाल हा एक भारतासाठी आव्हान आहे, असे समजून भारताने आणखी वेगाने प्रगती करून आपला ठसा उमठविणे गरजेचे झाले आहे.

# लहान मुलांच्या हौस-मजेसाठी 'तान्हा पोळा'

तान्हापोळा बहुतेक लहान मुलांच्या विरंगुळ्यासाठी साजरा करण्याची प्रथा आहे. बैल पोळ्याच्या पाडव्याला नागपूरसह पूर्व विदर्भात तान्हा पोळा उत्साहात साजरा केल्या जातो. ही ऐतिहासिक परंपरा असलेल्या या पोळ्याची सुरूवात राजे रघुजी भोसले यांनी केली होती. तेव्हा पासुन तान्हा पोळा साजरा करतात. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी साजरा होणारा तान्हा पोळा हा शहराचा अनोखा सण विदर्भाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा पुरावा आहे. शेतीतील बैलांच्या महत्त्वाची आठवण करून देणारा हा सण दोन शतकांहून अधिक काळापासून चालत आलेली परंपरा आहे.

भारत हा एक कृषिप्रधान देश आहे. महाराष्ट्रात व त्यातल्या त्यात विदर्भात, पोळा हा एक शेतकऱ्यांचा मोठा सण आहे. त्या दिवशी बैलांना कामकाजापासून सुट्टी असते. त्या दिवशी बैलांना न्हाऊ-माखू घालतात. त्यांना गोड पुरणपोळीचे जेवण घालतात, त्यांना सजवतात व मिरवतात. त्या दिवशी त्यांची घरोघरी पूजा होते. लहान मुले मोठे बैल नेऊ शकत नाहीत. ते त्यांना आवरू पण शकत नाहीत. म्हणून त्यांच्या हौस-मजेसाठी 'तान्हा पोळा' साजरा करण्यात येतो. त्या दिवशी लहान मुले लाकडापासून तयार केलेला बैल घेऊन खऱ्या बैलाप्रमाणेच या लाकडाच्या बैलाचा तान्हा पोळा साजरा करतात. या दिवशी लहान मुले आपआपल्या लाकडी बैलाला सजवतात. त्यानंतर एखाद्या जवळच्या मंदिरात किंवा मैदानावर हा तान्हा पोळा भरवल्या जातो. तो परिसर फुगे, तोरण, पताका लावुन सजविल्या जातो. प्रसंगी महादेवाची गाणी वाजविली जातात. नंदी बैल भगवान महादेवाचे वाहन असल्या कारणाने महादेवाच्या नावाचा जयजयकार केल्या जातो. त्यानंतर मुलांना काकडी व खोबऱ्याचा प्रसाद वाटप केल्या जाते. आणि पोळा फुटला असे जाहीर केल्या जाते.

गेल्या काही वर्षांपासुन या पोळ्याला संस्कृती व स्पर्धा याची झालर लागली आहे. अनेक पालक आपल्या मुलाला वेगवेगळ्या वेशभुषांमध्ये सजवुन आणतात. पोळा फुटायच्या आधी या सगळ्या छोट्या मुलांचे वेशभुषा निरीक्षण केले जाते. तसेच त्यांनी सजावुन आणलेल्या बैलाचे निरीक्षण केले जाते. पोळा फुटल्यानंतर उत्तम वेशभुषा व बैलाची उत्तम सजावट केलेल्या मुलांना क्रमांका प्रमाणे नंबर देऊन, त्यांना योग्य ते पारितोषिक दिल्या जाते. त्याचप्रमाणे सगळ्याच मुलांना काहीनाकाही छोटी भेटवस्तु दिली जाते. त्यानंतर ही मुले घरी येतात. ज्याप्रमाणे मोठ्या बैलांची सर्व प्रथम घरी पुजा केल्या जाते. त्याचप्रमाणे या लाकडी बैलांच्या पूजेला देखील घरुन सुरुवात होते. त्यानंतर ही मुले आपल्या शेजारी व नातेवाईकांकडे जाऊन 'बोजारा' जमा करतात, म्हणजे त्यांना पैसे किंवा भेटवस्तु दिल्या जाते.

लहान मुलांना देखील शेतीचे व त्यात राबराब राबणाऱ्या बैलांचे महत्व कळावे. आपल्या कृषीप्रधान संस्कृती विषयी ते कृतज्ञ राहावे, यासाठी कदाचित तान्हा पोळा हा सण साजरा करण्याची प्रथा विदर्भात रुजली असावी. यामुळे लहान मुलांमध्येही बैल या पशुधनाबाबत माहिती होऊन महाराष्ट्रीयन संस्कृती जपल्या जाते. नागपूरसह विदर्भातील जवळपास सगळ्याच जिल्ह्यांमध्ये तान्हापोळ्या निमित्त सगळ्याच वयोगटातील लोक लाकडी बैल घेऊन त्याची पुजा करून हा सन आनंदाने साजरा करतात. नागपुरातील या सणाला तब्बल २३५ वर्षांचा इतिहास आहे. त्यातच नागपुरातील सनियर भोसला पॅलेसमधील तब्बल आठ फुट उंचीचा लाकडी बैल सर्वांचे लक्ष वेधून घेतो. नागपुरातील लाकडी बैलांच्या (तान्हा) पोळ्याला २३५ वर्षे पूर्ण होत आहेत. महाराष्ट्रात सर्वत्र पोळा हा बैलांचा सण म्हणून साजरा होतो. पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे तान्हा पोळ्याला शहरातील अनेक भागात लाकडी बैलांचा पोळा भरतो. विदर्भ वगळता कुठेच हा पोळा साजरा होत नाही.

नागपूरकर भोसल्यांच्या शासनकाळात हा सण सुरू झाला. विदर्भात बहुधा सर्व ठिकाणी हा सण साजरा होतो. १७८९ मध्ये दुसरे श्रीमंत राजे रघुजी महाराज भोसले (द्वितीय) यांनी हा उत्सव सुरू केला. त्यांनी लहान मुलांना बैलांचे महत्त्व कळावे म्हणून हा उपक्रम हाती घेतला होता. राजे रघुजी महाराज भोंसले (द्वितीय) यांनी लाकडी बैल तयार करून सर्व लहान मुलांना वाटले. जिवंत बैलांप्रमाणे त्या बैलांना सजविण्यात आले. आंब्याचे तोरण लावून जिलेबी, फळे, चॉकलेट, बिस्कीट पुडे अशा विविध वस्तू तेथे बांधण्यात आल्या. बैलाजवळ मुलांना उभे करून बैलांची पूजा केली जायची. पूजा संपल्यानंतर तोरण तोडून पोळा फोडून वाजत गाजत हनुमान खिडकीचे दर्शन घेऊन हनुमानाला नारळ फोडून परत आल्यावर मुलांना खाऊ, पैसे, वाटले जायचे. सर्वांना तान्हापोळ्याच्या हार्दिक शुभेच्छा!

**********

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# नवी की जुनी पेन्शन योजना?

वीस वर्षांनंतर सरकारी कर्मचार्यांना पेन्शनसंबंधी एक नवीन योजना उपलब्ध झाली. मात्र ती २००४च्या पेन्शन योजनेच्या तुलनेत चांगली आहे का? पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेटच्या बैठकीत केंद्र सरकारने केंद्रीय सरकारी कर्मचार्यांसाठी निवृत्ती वेतनाच्या एका नव्या योजनेला मंजुरी देत महत्त्वाचे पाऊल टाकले. एकीकृत पेन्शन योजना (युनिङ्गाइड पेन्शन स्कीम यूपीएस) असे त्याचे नाव असून आगामी आर्थिक वर्षाच्या प्रारंभी म्हणजे १ एप्रिल २०२५ पासून लागू केली जाईल. या योजनेमुळे केंद्र सरकारच्या २३ लाख कर्मचार्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक लाभ मिळेल.गेल्या काही वर्षांपासून सरकारी कर्मचार्यांसाठी २००४ मध्ये वाजपेयी सरकारने आणलेल्या नव्या पेन्शन स्कीम योजनेबाबत असंतोष व्यक्त केला जात होता. विरोधकांनी या पेन्शन योजनेला आक्षेप घेतला. काही राज्यांनी तत्कालीन काळात जुनी पेन्शन स्कीम (ओपीएस) लागू केली आणि नवी पेन्शन योजना नाकारली होती. सर्वप्रथम राजस्थानच्या गेहलोत सरकारने जुनी योजना लागू केली. या सर्व घडामोडींचा दबाव केंद्र सरकारवर सातत्याने होता. त्यामुळे २०२३ च्या अर्थसंकल्पात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी टी. व्ही. सोमनाथन यांच्या अध्यक्षतेखाली नवी पेन्शन योजनेसंदर्भात समिती स्थापन करण्याची घोषणा केली. या समितीचा आराखडा लोकसभा निवडणुकीच्या अगोदर जाहीर करणे अपेक्षित होते, परंतु ते होऊ शकले नाही. पण केंद्रात सत्ता स्थापन केल्यानंतर शंभर दिवस पूर्ण होण्याच्या अगोदरच केंद्र सरकारने नवीन आणि सर्वसमावेशक योजनेला मंजुरी दिली. एकीकृत पेन्शन योजनेने एका चर्चेला हवा दिली आणि ती म्हणजे केंद्र सरकार जुन्या काळापासून लागू असलेली आणि २००४ पर्यंत कायम राहिलेली जुनी पेन्शन योजनेकडे पुन्हा झुकते माप देत आहे का? पण केंद्र सरकारचे असे कोणतेही धोरण दिसत नाही, हे देखील लक्षात घ्यायला हवे. जुन्या पेन्शन योजनेनुसार सरकारी कर्मचार्यांना सेवा कार्यकाळात पेन्शन निधीत काहीही जमा करावे लागत नाही तसेच निवृत्त झाल्यानंतर पेन्शन अणि मृत्यूनंतर कुटुंबाला मिळणारी पेन्शन शंभर टक्के सरकारी अंशदानाच्या आधारे मिळत राहते. स्वतंत्र भारतात ही योजना ५७ वर्षे अंमलात राहिली. २००४ मध्ये ती योजना संपवून नवीन पेन्शन योजना आणली आणि त्यात सरकारी कर्मचार्यांना सेवा कार्यकाळात पेन्शनच्या दृष्टीने वेतनातील एक भाग नियमित रूपाने अंशदान देणे बंधनकारक करण्यात आले होते. परंतु २०२५ मध्ये लागू होणार्या युनिङ्गाइड पेन्शन स्कीम (यूपीएस) मध्ये कर्मचार्यांना २००४ च्या नव्या पेन्शनप्रमाणेच वेतनाच्या दहा टक्के रक्कम निधीत जमा करावा लागेल, पण आता यात सरकारचा वाटा आणखी वाढणार आहे. एकुणातच कर्मचार्यांना पेन्शनच्या हेतूनेच अंशदान जमा करावे लागेल आणि त्यात कोणतीही सवलत दिलेली नाही हे लक्षात घ्या. २० वर्षांनंतर सरकारी कर्मचार्यांना पेन्शनसंबंधी एक नवीन योजना उपलब्ध झाली आणि ती २००४ च्या पेन्शन योजनेच्या तुलनेत खूप चांगली आहे. उदाहरणार्थ, सरकारी कर्मचार्यांना एक निश्चित रकमेची हमी पेन्शनच्या रूपातून मिळणार आहे आणि ती सुविधा 'एनपीएस'मध्ये नव्हती. त्याचवेळी कर्मचारी आपल्या वेतनाच्या दहा टक्के वाटा अंशदान रूपातून जमा करत होता. पण नव्या योजनेच्या माध्यमातून २५ वर्षांपर्यंत काम केल्यानंतरच शेवटच्या वर्षातील मूळ रकमेचा ५० टक्के वाटा कोणत्याही स्थितीत पेन्शनच्या रूपातून कर्मचार्यांना मिळणार आहे. त्याचवेळी एखाद्याची सेवा २५ वर्षांपेक्षा कमी असेल, तर पेन्शनची रक्कम सेवेच्या वर्षाच्या प्रमाणात निश्चित राहील. या योजनेची आणखी एक महत्त्वाची बाजू म्हणजे सेवा किमान दहा वर्षे केली असेल, तर मासिक पेन्शनची रक्कम ही दहा हजार रुपये निश्चितच असेल. ही तरतूद कौतुकास्पद आहे. एक अन्य सकारात्मक बाजू म्हणजे पेन्शन असणार्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास मासिक पेन्शनचा ६० टक्के वाटा कौटुंबिक पेन्शनच्या रूपातून कर्मचार्याच्या वारसास दरमहा मिळत राहील आणि या योजनेनुसार महागाई भत्त्याला देखील पेन्शनच्या रकमेत सामील केले आहे. अर्थात, ही सुविधा एनपीएसमध्ये नव्हती. दर तीन वर्षांनंतर पेन्शन ङ्कंडमध्ये सरकारी अंशदानाची मर्यादा वाढविण्यासंदर्भात मूल्यांकन केले जाईल आणि हे अंशदान सध्या १८.५ टक्के निश्चित केले आहे. कर्मचार्यांचे अंशदान भविष्यात दहा टक्केच राहील आणि त्यात वाढ केली जाणार नाही. या तरतुदी पाहता एनडीए सरकारची ही पेन्शन योजना २००४च्या योजनेच्या तुलनेत चांगली दिसत आहे. तसेच २००४ च्या योजनेतून या योजनेत येणार्या कर्मचार्यांना ङ्करक देखील दिला जाईल. त्याचा आर्थिक बोजा किमान ८०० कोटी रुपयांचा असेल. जुन्या योजनेची आणि एकीकृत पेन्शन योजनेची तुलना केल्यास एनडीए सरकारने या योजनेच्या माध्यमातून जुनी पेन्शन योजनेचे लाभ पुन्हा कर्मचार्यांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही काही गोष्टींवर आजही जुनी पेन्शन योजना तुलनेने सरकारी कर्मचार्यांसाठी अधिक ङ्कायदेशीर राहत असल्याचे दिसून येते. एक त्यात किमान वीस वर्षांनंतर वेतनाच्या ५० टक्के रक्कम पेन्शनच्या रूपातून मिळणे निश्चित होते आणि तो लाभ आता २५ वर्षांनंतर मिळणार आहे. दुसरे म्हणजे युनिङ्गाइड पेन्शन स्कीमनुसार सेवानिवृत्ती मिळाल्यानंतर ग्रॅच्युईटीची रक्कम जुन्या पेन्शन योजनेच्या तुलनेत सुमारे ३० टक्के कमी राहील आणि त्यामुळे या योजनेत सामील होणार्या सरकारी कर्मचार्यांसाठी हे एकप्रकारचे आर्थिक नुकसान राहू शकते. मात्र दुसरीकडे जुन्या पेन्शन योजनेच्या तुलनेत एकीकृत निवृत्ती योजनेत काही चांगल्या बाजू देखील आहेत. ङ्कॅमिली पेन्शननुसार आता ६० टक्के वाटा दिला जाईल, तर पूर्वी हा ३० टक्के होता आणि किमान पेन्शनची मर्यादा देखील ९ हजारांवरून १० हजार रुपये केली आहे. साहजिकच कर्मचार्यांकडून या योजनेचे स्वागत होईल, परंतु काही प्रमाणात नाराजीचे सूर देखील उमटू शकतात. पेन्शनचा मुद्दा अजूनही काही काळ राजकीय राहील. कारण जुनी पेन्शन योजना ही काही राज्यांत सक्रिय आहे.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयातील डॉ.प्रमोद माने व मुख्य लिपिक एल.आर.कांबळे सेवानिवृत्त

## सेवा गौरव सोहळ्यात सत्कार

लातूर :– येथील दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील डॉ.प्रमोद माने व मुख्य लिपिक एल.आर.कांबळे सेवानिवृत्त झाले आहेत.त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त दि.३१ ऑगस्ट २०२४ रोजी निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.यावेळी दोघांचाही महाविद्यालयाच्या वतीने सपत्नीक यथोचित सत्कार करण्यात आला.या निरोप समारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड होते.याप्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,सेवानिवृत्त सत्कारमूर्ती डॉ.प्रमोद माने,सौ. संगीता माने व मुख्य लिपिक एल.आर.कांबळे,सौ.कांबळे, पर्यवेक्षक डॉ.वैशाली पाटील, पर्यवेक्षक डॉ.संध्या कोल्हे–वाडीकर, पीआरओ प्रा.बळवंत सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.



याप्रसंगी प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड असे म्हणाले की,दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील डॉ.प्रमोद माने हे अनुभवी,तज्ज्ञ,अभ्यासू आणि कर्तव्यनिष्ठ,विद्यार्थीप्रिय,अध्यापन कौशल्य असलेले हाडाचे शिक्षक आहेत.तसेच एल.आर.कांबळे हेही शिस्तप्रिय कर्मचारी आहेत.त्यांच्या सेवानिवृत्तीमुळे निश्चितच पोकळी निर्माण होणार आहे.त्यांची प्रदीर्घ सेवा ही निश्चितच आठवणीत राहणारी आहे,असे त्यांनी सांगितले.तर प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी दयानंद शिक्षण संस्थेत व दयानंद परिवारात नोकरी करण्याचे भाग्य डॉ.प्रमोद माने व कांबळे यांना लाभले.कारण एका नामांकित संस्थेत त्यांनी नोकरी केलेली असल्यामुळे समाजाचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन निश्चितच चांगला असेल,असे ते म्हणाले.

यावेळी सेवानिवृत्त सत्कारमूर्ती डॉ.प्रमोद माने व कांबळे यांनीही आपल्या भावपूर्ण मनोगतातून संस्था,महाविद्यालय,सहकारी प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांप्रती असलेल्या भावस्पर्शी भावना सांगितल्या.याचबरोबर उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव यांनीही आपल्या मनोगतातून सेवानिवृत्त होत असलेले दोघेही मनमिळाऊ, मितभाषी,सहकार्यशील, कर्तव्यनिष्ठ होते, असे त्यांचे कौतुक केले.



सूत्रसंचालन पीआरओ प्रा.बळवंत सूर्यवंशी यांनी केले तर आभार प्रा.डी.व्ही.कुलकर्णी यांनी मानले.याप्रसंगी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी, नातेवाईक,गुरूजण आणि मित्रपरिवार बहुसंख्येने उपस्थित होते.

# जीभ दाखवा, आजार ओळखा! वैज्ञानिकांनी शोधले अनोखे तंत्र

शतकानुशतके वैद्य नाडी पाहून आणि जीभ पाहून आजाराबाबत सांगत होते. मात्र नंतर काळ बदलू लागला. आधुनिकतेच्या आंधळ्या शर्यतीत लोक धावू लागले. दिवसेंदिवस समाजाचा विकास होऊ लागला, त्यासोबत आपल्या आजूबाजूच्या गोष्टीही हळूहळू बदलत गेल्या. विकासाच्या या शर्यतीत आपण काही गमावले असेल तर ती आपली प्राचीन वैद्यकीय पद्धत होती. पण आता हीच जुनी पद्धत अर्थात अशी वैद्यकीय प्रथा पुन्हा आपल्या आयुष्यात येणार आहे, ज्यामध्ये एखाद्या व्यक्तीची जीभ पाहून, आर्टिफिशियल इंटिलिजन्स द्वारे मशीन त्याच्या आजारांचे अचूक निदान करेल. हे केवळ आजारांना लवकर सांगण्यात मदत करेल असे नाही तर वारंवार रक्त तपासणी करण्यापासूनदेखील वाचवेल. इराकच्या मिडल टेक्निकल युनिव्हर्सिटीच्या संशोधकांच्या संशोधनामुळे हे शक्य होणार आहे. विकसित मॉडेल अलीकडे, इराकच्या मिडल टेक्निकल युनिव्हर्सिटीच्या शास्त्रज्ञांनी एक एआय मॉडेल विकसित केले आहे जे जिभेच्या चित्रांवरून ९८ टक्के अचूकतेसह नक्की कोणता आजार आहे हे ओळखू शकते. हे तंत्रज्ञान रिअल टाइममध्ये जीभेच्या फोटोचे विश्लेषण करते आणि जलद आणि अचूक परिणाम देते. जर हे तंत्रज्ञान पूर्णपणे यशस्वी झाले, तर कोणताही आजार शोधणे ही काही मिनिटांची बाब असेल आणि लवकरात लवकर आजाराचे निदान करता येईल. जिभेचा रंग आणि पोत सांगेल आजार या तंत्राचा पाया प्राचीन चिनी वैद्यकीय पद्धतीवर आधारित आहे, जिथे डॉक्टर जिभेचा रंग आणि संरचनेवर आधारित आजारांचे निदान करायचे.

# बिबट्या पळाला, त्याच्यामागे गेंडाही पळाला

कोल्हापूर : राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी सोलापूरनंतर आता कोल्हापूरमध्ये आपला मोर्चा वळवला आहे. गेल्या महिन्यात सोलापूर दौरा केल्यानंतर शरद पवार आता ४ दिवसीय कोल्हापूर दौऱ्यावर असून आज त्यांच्या प्रमुख उपस्थितीत समरजित घाटगे यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश झाला. येथील कार्यक्रमात, माळशिरस मतदारसंघातून निवडणुकीसाठी इच्छुक असलेले आणि लोकसभा निवडणुकीत तुतारी हाती घेतलेल्या उत्तम जानकर यांनी मंत्री हसन मुश्रीफ यांच्या कागलमध्ये जाऊन त्यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला.

लोकसभा निवडणुकांच्या रणधुमाळीत हसन मुश्रीफ यांनी उत्तम जानकर यांच्यावर टीका केला होती, या टीकेचा संदर्भ देत जानकर यांनी हसन मुश्रीफ यांना चक्क गेंडा म्हणत टीका केली. माझ्यावर कागलच्या नेत्यांनी टीका केली, म्हणून मी इथपर्यंत आलोय, असे म्हणतच त्यांनी आपल्या भाषणाची सुरुवात केली.

लोकसभा निवडणुकांवेळी माढा मतदारसंघात उत्तम जानकर यांनी तुफान बॅटींग केली होती. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार यांच्यावर शाब्दीक हल्ले चढवले होते. त्यानंतर, आता विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने ते कोल्हापूरमधील कागल येथे



आले असता हसन मुश्रीफ व अजित पवार यांच्यावर त्यांनी जोरदार टीका केलीय. माझ्यावर कागलच्या नेत्यांनी टीका केली, म्हणून मी इथपर्यंत आलोय. जंगलाला आग लागली, बिबट्या जंगल सोडून पळाला आणि त्याच्यामागे गेंडासुद्धा पळून गेला, असे म्हणत नाव न घेता अजित पवार आणि हसन मुश्रीफांवर हल्लाबोल केला. या बहाद्दराला काय दिलं नाही, गोकुळचं दुध प्यायला दिलं, काजू बदाम खायला घातले.

गोरगरीब शेतकऱ्याला कर्ज मिळावं यासाठी याच्याकडे केडीसीसी बँकेच्या चाव्या दिल्या. मात्र, या माणसानं भ्रष्टाचार केला म्हणून याच्याकडे ईडी आली, पण ईडी आल्यावर पोटासहीत पळाला. हा माणूस नतद्दष्ट निघाला, अशा शब्दात उत्तम जानकर यांनी हसन मुश्रीफ यांच्यावर हल्लाबोल केला. साखर कारखान्याला नुसतं संताजी नाव दिलं, याला तर भ्रष्टाचारी साखर कारखाना नाव दिलं पाहिजे, असे म्हणत मुश्रीफ यांनी सुरु केलेल्या साखर कारखान्यावरुनही जानकर यांनी टीका केली.

# शालिय विद्यार्थ्यांना कायदेविषयक सल्ला मार्गदर्शन देणे ही काळाची गरज

नवी मुंबई / के.एच. हनवते:– अंकिता मोटार ट्रेनिंग स्कूल आयोजित नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानदीप माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेमध्ये मुलींनी कसे राहावे तसेच आपल्याला कोणीही जाणुनबुजून शाळेत जाताना येताना त्रासदायक किंवा आपल्या राहत्या घराच्या आजूबाजूला जर कोणी ही त्रास देत असेल तर काय करायचे याविषयांवर तसेच नवीन कायद्याबाबत माहिती देण्यासाठी प्रमुख उपस्थित सौ दिपाली जाधव मॅडम नवी मुंबई मोटार वाहन निरीक्षक परिवहन विभाग नवी मुंबई, सौ संगीता दिलीप आमले संचालिका अंकिता मोटार ट्रेनिंग स्कूल, सौ संगीता दाते, मुख्याध्यापक श्री प्रकाश पाटील, व्यसनमुक्ती जनजागृती मार्गदर्शक आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले शाळेतील सर्व शिक्षिका तसेच २०० पेक्षा जास्त मुली उपस्थित होत्या मुलींना योग्य मार्गदर्शन मिळावे म्हणून




आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले व्यसनमुक्ती जनजागृती मार्गदर्शक यांनी अंकिता मोटार ट्रेनिंग स्कूल च्या सहकार्यने कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

# मोबाईल इंटरनेट सारखं स्लो होत आहे ? वापरा हे सोपे उपाय

अनेकदा काही कारण नसताना मोबाईल मधील इंटरनेट स्लो होते. बरेचदा नेटवर्कचा इश्यू असे या समजुतीने आपण बरेचदा काही उपाय करत नाही. स्लो इंटरनेटचे खापर अनेकदा सर्व्हिस प्रोवायडरवरही फोडले जाते. पण तुम्हाला माहिती आहे का ? स्लो इंटरनेटला अनेकदा मोबाइलही कारणीभूत असतो. या सोप्या ट्रिक्स वापरुन तुम्ही कमी झालेला मोबाइल इंटरनेटचा स्पीड वाढवू शकता.



तुमचा फोन रिस्टार्ट करा : कम्प्युटरवर इंटरनेट वापरताना रीफ्रेश हा पर्याय सतत वापरला जातो. त्याच प्रमाणे मोबाइलही रीफ्रेश करण्याची गरज असते. मोबाइल रिस्टार्ट करून तो केला जाऊ शकतो. कॅशे आणि कुकीज क्लिअर केल्या का ? : मोबाइलमधील कॅशे आणि कुकीज फाईल फोन स्लो करतातच पण अनेकदा इंटरनेट स्पीडवरही त्याचा परिणाम होताना दिसतो. सेटिंग्जमध्ये जाऊन तुम्ही कॅशे आणि कुकीज फाईल क्लियर करू शकता.

नेटवर्कचा वापर : मुळे बरेचदा स्पीड स्लो झाल्याची तक्रार केली जाते. पण यामुळे दरवेळीच असे होत नाही. तुमच्या ट्राफिकला एनक्रिप्ट करून त्याचा सुरक्षित सर्व्हर माध्यमातून स्पीड वाढवण्यास मदत करतो. अपडेट्स : अनेकदा सॉफ्टवेअर वेळीच अपडेट केले नसेल तर मोबाइल आणि इंटरनेट चा स्पीड कमी होऊ शकतो. त्यामुळे मोबाइल सॉफ्टवेअर वेळीच अपडेट केलेले केव्हाही चांगले. बॅकग्राऊंड अ‍ॅप : अनेकदा बॅकग्राऊंडमध्ये सुरू असलेल्या अ‍ॅपमुळे इंटरनेट स्लो होते. याशिवाय या अ‍ॅपमुळे अतिरिक्त डेटा वाया जातो. त्यामुळे इंटरनेट क्वालिटी सुधारण्यासाठी एकदा बॅकग्राऊंड अ‍ॅप बंद आहेत याची खात्री करा.

# तुम्ही तुमच्या पाण्याची बाटली रोज धुता का? नाही. मग ही बातमी वाचा, जाणून घ्या तज्ज्ञ काय सांगतात..

शरीरातील पाण्याची पातळी राखणे किती आवश्यक आहे, याबाबत वैद्यकीय क्षेत्रामध्ये चर्चा आहे आणि दिवसभरामध्ये किती वेळा पाणी प्यायले पाहिजे याबाबत विविध मदभेद आहेत. पण, या सर्वांमध्ये दिवसभर आपली तहान भागवणाऱ्या पाण्याच्या बाटल्या मात्र दुर्लक्षित होत आहेत. आपल्यापैकी बहुतेक लोक पाण्याच्या बाटल्यांची स्वच्छता आणि सुरक्षितता याकडे दुर्लक्ष करतात.



नोएडा येथील यथार्थ सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये कन्सल्टंट पेडिएट्रिशियन म्हणून कार्यरत असलेले डॉ. प्रशांत यांनी द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना सांगितले की, पाण्याच्या बाटलीची नियमित स्वच्छता न केल्यास बॅक्टेरियांची वाढ होते. बंदिस्त आणि ओलसर भागात बॅक्टेरियाच्या वाढीस चालना मिळते. साल्मोनेला आणि ए.लेश्रळ यांसारखे बॅक्टेरिया पाण्याच्या बाटलीमध्ये वाढतात. तसेच पाण्याच्या बाटलीमध्ये बुरशी निर्माण होण्याची शक्यता आहे.वेळच्या वेळी प्लास्टिकच्या बाटल्या न धुतल्याने दुर्गंधी येऊ शकते. पाण्याच्या बाटलीमध्ये बायोफिल्म नावाचा बॅक्टेरिया विकसित होतो, जो साफ करून नष्ट करणे अवघड आहे.तुम्ही तुमच्या पाण्याच्या बाटल्या कशा धुतल्या पाहिजे?डॉ. प्रशांत यांनी सुचवले की, वाहत्या पाण्याखाली फक्त बाटली धुण्यापेक्षा रोज साबणाच्या पाण्याने बाटली धुणे जास्त योग्य आहे. पाण्याच्या बाटलीचा वापर जर ज्यूस, सॉफ्ट ड्रिंक यांसारख्या पेयांसाठी केल्यास ती बाटली प्रत्येकवेळी धुवून मगच वापरावी.जर प्लास्टिकची बाटली तुम्ही वापरत असाल तर हे लक्षात ठेवले पाहिले की, जेव्हा ते गरम पाणी किंवा रासयिनक डिटर्जंट पावडरच्या संपर्कात आल्यास त्यांचे नुकसान होऊ शकते. तसेच जर काचेची बाटली वापरत असाल तर ती एका विशिष्ट मर्यादेपर्यंत उष्णता सहन करू शकते, तसेच स्टेनलेस स्टीलची बाटली कधीकधी ब्लीच आणि क्लोरीनच्या संपर्कात आल्यास रासायनिक प्रक्रिया होते, ज्यामुळे तुमच्या भांड्याच्या आतील बाजूस नुकसान होऊ शकते.तुम्ही पाण्याची बाटली निवडताना काळजी घेणे आवश्यक आहे.

# चेहऱ्यावर मुरूम आणि पिंपल्स आले आहेत? मग करून पहा ‘हे’ घरगुती उपाय

सुंदर त्वचा मिळवण्यासाठी महिला अनेक वेगवेगळे उपाय करतात. पण अनेकदा चमकदार आणि स्वच्छ त्वचेवर पिंपल्स किंवा मुरूम आल्यानंतर त्वचेचे सौंदर्य खराब होऊन जाते. पिंपल्स किंवा मुरूम येण्यामागे अनेक कारण आहेत.शरीरातील हार्मोनल बदल, खाण्यापिण्याच्या सवयी, चुकीची जीवनशैली इत्यादी गोष्टींचा परिणाम दिसू लागल्यानंतर त्वचा खराब होऊन जाते. वातावरणात बदल झाल्यानंतर चेहऱ्यावर त्याचे परिणाम दिसून येतात. पावसाळ्यात वातावरणातील आद्रतेचा परिणाम चेहऱ्यावर दिसू लागल्यानंतर त्वचा चिकट आणि तेलकट होऊन जाते. तेलकट झालेली त्वचा वेळीच स्वच्छ केली नाहीतर चेहऱ्यावर साचून राहिलेल्या धूळ, माती आणि तेलामुळे पिंपल्स येऊ लागतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला चेहऱ्यावरील मुरूम आणि पिंपल्स पासून सुटका मिळवण्यासाठी कोणते घरगुती उपाय करावे, याबद्दल सांगणार आहोत.जीवनशैलीत बदल करणे: निरोगी आणि सुंदर त्वचा मिळवण्यासाठी फक्त क्रीम्स आणि महागड्या प्रॉडक्टचा वापर न करता योग्य त्या जीवनशैलीचा अवलंब करून जीवन जगले पाहिजे. अनेकांना रात्रीच्या वेळी उशीरा जेवण्याची आणि झोपण्याची सवय असते. उशिरा जेवल्यामुळे पचनक्रिया बिघडून जाते . त्यामुळे योग्य वेळात जेवून आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. मानसिक तणाव वाढल्यामुळे जीवन बदलून जाते.




मानसिक तणावाचा परिणाम चेहऱ्यावर सुद्धा दिसून येतो. त्यामुळे मानसिक आरोग्य सुधरण्यासाठी व्यायाम आणि प्राणायाम करणे आवश्क आहे. हार्मोनल असंतुलन: महिलांच्या शरीरात सातत्याने हार्मोनल बदल होत असतात. हे बदल काहीवेळ चेहऱ्यावर सुद्धा दिसतात. पिंपल्स येणे, मुरूम येणे, त्वचेसंबंधित समस्या निर्माण होणे इत्यादी लक्षणे दिसू लागल्यानंतर हळूहळू त्वचा खराब होऊन जाते. त्वचेची गुणवत्ता कमी झाल्यामुळे चेहरा खराब होतो. हार्मोन्स असंतुलित झाल्यानंतर टेस्टोस्टेरॉनसारखे एंड्रोजन मुरुम येण्यास कारणीभूत ठरतात. पुरळ किंवा मुरूम येऊ नये म्हणून काय करावे? चेहऱ्यावर मुरूम किंवा पुरळ येऊ नये म्हणून संतुलित आहार घेणे आवश्यक आहे. शरीराला गुणकारी ठरतील अशा पदार्थांचे सेवन केल्यामुळे त्वचा सुधारण्यास मदत होते. त्वचा स्वच्छ ठेवण्यासाठी चेहरा सूट होईल असा फेशवॉश निवडावा. चुकीच्या फेशवॉशमुळे चेहरा खराब होऊन जातो. फेसवॉशचा वापर केल्यामुळे चेहरा अधिक एक्सफोलिएट होऊन तेल नियंत्रणात राहते. हे देखील वाचा: स्वयंपाक घरातील ‘या’ डाळीचा वापर करून चेहऱ्याची चमक वाढवा, फेसपॅकमुळे त्वचेवर दिसेल तारुण्य फेसवॉश विकत घेताना त्यात सॅलिसिलिक सिड आणि ग्लायकोलिक सिडचे प्रमाण जास्त असलेला फेसवॉश खरेदी करावा. यामुळे त्वचेवरील मुरुमांची समस्या कमी होते.

त्वचेचा खराब झालेला रंग सुधारण्यासाठी फेस सीरम लावावे. यामुळे काळी पडलेली त्वचा उजळून पुन्हा एकदा चेहऱ्यावर चमकदार ग्लो येतो.

# किनवट माहूर तालुक्यातील शेतकऱ्यांना अर्थसहाय्य मिळवून देण्यास कटीबद्धः आ. भीमराव केराम

किनवट माहूर तालुक्यावर जेव्हा जेंव्हा नैसर्गिक संकट ओढवते तेव्हा तेव्हा सरकारकडून नुकसानग्रस्त शेतकरी व बेघर कुटुंबीयांना अर्थसहाय मंजूर केले जाते. आपत्तीकाळात परिस्थितीवर लक्ष ठेवण्याच्या सूचना मी प्रशासनाला दिल्या आहेत. शेतकरी व नागरिकांनी हताश होऊ नये तालुक्यातील सरसकट शेतकऱ्यांना शासनाचे अर्थसहाय्य मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे असे आश्वासन आमदार भीमराव केराम यांनी शेतकऱ्यांना दिले आहे.



किनवट/शेख शौकत :- ३१ ऑगस्ट पासून किनवट माहूर तालुक्यात वादळी वाऱ्यासह पाऊस सुरू असून या पावसामुळे नदी नाल्यांना पूर येऊन खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले तर वादळी वाऱ्यात अनेकांच्या घरांची पडझड होऊन गोरगरिबांचे संसार उघड्यावर आले आहेत. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून सरसकट शेतकरी व बेगर झालेल्या कुटुंबांना शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी असे पत्र आमदार भीमराव केराम यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे. पत्रात नमूद केले आहे की दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी किनवट व माहूर तालुक्यात वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस सुरू आहे. मागील चोवीस तासात १८० मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. संततधार पावसामुळे नदी नाल्यांना पूर येऊन कापूस सोयाबीन ज्वारी तूर मूग उडीद अशा उभ्या खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले. नदी व नाल्याकाठच्या शेतात पुराचे पाणी शिरून पिकासह जमिनी खरडून गेल्या आहेत तर काही ठिकाणी पशुधन दगावले आहेत. सुसाटवारा व मुसळधार पावसात उभी पिके आडवी झाली असून शेतजमिनी पाण्याखाली आल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. वादळी पावसात अनेकांच्या घरांची पडझड होऊन गोरगरीब कुटुंबे उघड्यावर पडली आहेत. या नुकसानीचे तात्काळ वस्तुनिष्ठ पंचनामे करून सरसकट शेतकरी व बेघर झालेल्या कुटुंबाना शासनाने तातडीने अर्थसहाय्य मंजूर करावे अशी मागणी आमदार भीमराव केराम यांनी मुख्यमंत्र्याकडे केली आहे.

# दीपावलीकरिता रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी मुंबई - लातूर साप्ताहिक दिवाळी स्पेशल रेल्वे



लातूर :- मध्य रेल्वे प्रशासनाच्या वतीने दीपावलीच्या सणानिमित्त रेल्वे प्रवाशांच्या सोयीकरिता मुंबई – लातूर आणि लातूर – मुंबई ही साप्ताहिक दीपावली स्पेशल रेल्वे सुरू करण्याचा अत्यंत महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून या रेल्वेमुळे असंख्य प्रवाशांना प्रवासाची मोठी सोय होणार आहे अशी माहिती मध्य रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य चंद्रकांत कातळे यांनी दिली. दीपावलीचा सण मोठा, नाही आनंदाला तोटा याप्रमाणे प्रत्येकाची मुंबई – पुण्याहून आपल्या गावाकडे दिवाळीसाठी जाण्याची ओढ असते मात्र बऱ्याच वेळा प्रवासाची सोय होत नसल्याने अनेकांना इच्छा असूनही गावाकडे जाता येत नाही ही अडचण लक्षात घेऊन मध्य रेल्वे प्रशासनाच्या वतीने लातूरकरिता स्वतंत्रपणे मुंबई – लातूर आणि लातूर – मुंबई ही दिवाळी स्पेशल साप्ताहिक रेल्वे सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मध्य रेल्वेने घेतलेल्या निर्णयानुसार या रेल्वेच्या चार फेऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत अशी माहिती चंद्रकांत कातळे यांनी दिली.

दीपावलीच्या निमित्ताने दि १८ ऑक्टोबर २०२४, दि. २५ ऑक्टोबर २०२४, दि. १ नोव्हेंबर २०२४ आणि दि. ९ नोव्हेंबर २०२४ या तारखेला मुंबई – लातूर (०११०५) मुंबईहून रात्री १२.३० वाजता लातूरकडे रवाना होईल आणि सकाळी ११.०० लातूरला पोहोचेल. या रेल्वेचा परतीचा प्रवास लातूर – मुंबई (०११०६) त्याच दिवशी दुपारी ४.३० लातूरहून निघेल आणि पहाटे ४.१० वाजता मुंबईत पोहोचेल. या रेल्वेगाडीला २ एसी कोच, ८ स्लीपर कोच आणि ६ जनरल डबे असणार आहेत.

सदरील साप्ताहिक दीपावली स्पेशल रेल्वेगाडीमुळे रेल्वे प्रवाशांना मोठी सोय होणार असून या रेल्वेचे लवकरच बुकिंग सुरू होणार असल्याची माहिती मध्य रेल्वेचे सल्लागार समिती सदस्य चंद्रकांत कातळे आणि शामसुंदर मानधना यांनी दिली.

# ग्रामपंचायतीतील १५ लाखांपर्यंतची कामे आता कंत्राटदारामार्फत होणार,

किनवट/शेख शौकत :-आतापर्यंत १५ लाखांपर्यंतची कामे विनानिविदा करण्यास ग्रामपंचायतींना परवानगी असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या मान्यताप्राप्त नोंदणी असलेले सुशिक्षित बेरोजगार अभियंता, कंत्राटदार, मजूर सहकारी संस्थांना या कामांपासून वंचित राहावे लागत होते. त्यामुळे, त्यांनी उच्च न्यायालयात याविषयी यादी मागितली होती. त्या पार्श्वभूमीवर आता यापुढे १५ लाखांपर्यंतची कामेसुद्धा मान्यताप्राप्त कंत्राटदारांमार्फत घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. हा निर्णय म्हणजे सुशिक्षित बेरोजगार अभियंते, लहान कंत्राटदारांसाठी फायदेशीर असल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे कंत्राटदार संघटनेने न्यायालयात धाव घेतल्यानंतर शासनाने हा निर्णय घेतला आहे. शासनाच्या ग्रामविकास विभागाकडून १२ नोव्हेंबर २०२१ च्या निर्णयानुसार जिल्हा परिषद व पंचायत समि तीला पंधराव्या वित्त आयोगांतर्गत शासननिधीतून १५ लाखांपर्यंतची सर्व कामे करण्यास परवानगी देण्यात आली होती. या निर्णयामुळे जिल्हा परिषद अंतर्गत नोंदणी असलेले सुशिक्षित बेरोजगार, स्थापत्य अभियंता, कंत्राटदार तसेच मजूर सहकारी संस्थांना १५ लाखाच्या आतील कामेच मिळत नव्हती. त्यामुळे कंत्राटदार व मजुरांच्या हाताला कामच उपलब्ध नव्हते. तसेच ग्राम पंचायतींकडून १५ लाखांच्या आतील ही कामे परस्पर केली जात होती. शिवाय ग्रामपंचायत पदाधिकारी आपल्या मर्जीतील लोकांनाच ही कामे देत होते. यातून ग्रामपंचायत आणि ठेकेदार हे समीकरण तयार झाले होते. अनेक ठिकाणी अनेकदा नियमबाह्य पद्धतीने कामे दिली गेली, अशी ओरड सातत्याने होत होती. त्यामुळे या निर्णयाविरोधात महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाने आव्हान देत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयाने १० जुलै २०२४ रोजी दिलेल्या आदेशाचा आधार घेऊन २२ जुलै २०२४ रोजी जिल्हा परिषदांना यापुढे ग्रामपंचायतींना कामे न देण्याबाबत कळविले असून, शासनाने एक पाऊल मागे घेत आपला निर्णय फिरविला आहे. शासनाने बदलेल्या भूमिकेमुळे मात्र आता लहान कंत्राटदारांना सुद्धा नियमानुसार कामे करता येणार आहेत. यापुढे १२ नोव्हेंबर तसेच ३० डिसेंबर २०२१ चे पत्र पूर्वलक्षी प्रभावाने रद्द केले असून, आदेशाचे उल्लंघन झाल्यास जिल्हा परिषद प्रशासनाला जबाबदार धरले जाणार आहे.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज उदगीरमध्ये मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, क्रीडा मंत्र्यांच्या उपस्थितीत महिलांचा आनंद मेळावा

## उदगीरच्या विश्वशांती बुद्ध विहाराचे आज होणार लोकार्पण

लातूर :- मराठवाड्यातील ऐतिहासिक नगरी असणाऱ्या उदगीरला भारताच्या प्रथम नागरिक राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या, ४ सप्टेंबरला सकाळी सव्वा अकरा वाजता येणार आहेत. त्यांच्यासोबत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेही आगमन होणार आहे. त्यांच्या आगमनासाठी शहर सजले असून महिलांचा आनंद मेळावा व विश्वशांती बुद्ध विहाराचे लोकार्पण उद्याचे प्रमुख आकर्षण आहे.



मराठवाड्याच्या प्रथम दौऱ्यावर येत असलेल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या सकाळी नांदेड येथे विशेष विमानाने येत असून त्या ठिकाणावरून हेलिकॉप्टरने उदगीरला येत आहे.

राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे जिल्हाधिकारी वर्षा घुगे-ठाकूर यांच्या मार्गदर्शनात जिल्हा प्रशासन गेल्या अनेक दिवसांपासून या आयोजनासाठी झटत असून उद्या राष्ट्रपतींचे उदगीर येथे आगमन होणार आहे. त्यानंतर त्या उदगीर शहराच्या भागात असणाऱ्या विश्वशांती बुद्ध विहाराच्या लोकार्पणाला उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रपती या ठिकाणी असतील त्यानंतर उदयगिरी कॉलेज मैदानावर आयोजित महिला आनंद मेळाव्याला त्या सहभागी होतील. या कार्यक्रमांमध्ये राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे सहभागी होणार आहेत.

राज्य शासनाने या ठिकाणी शासन आपल्या दारी आणि मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना व अन्य लाभाच्या योजनांच्या कार्यक्रमांचा आनंद मेळावा आयोजित केला आहे. हजारो महिला या ठिकाणी उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रपती या ठिकाणी मार्गदर्शन करणार आहेत. उद्या राष्ट्रपती महिलांना काय मार्गदर्शन करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले असून जिल्हाभरातील महिलांना उद्याच्या कार्यक्रमाची उत्सुकता आहे.

राष्ट्रपती कार्यक्रमानंतर पुन्हा नांदेडकडे प्रयाण करतील. नांदेड वरून त्या दिल्लीला रवाना होणार आहेत. राष्ट्रपती गेल्या दोन तारखेपासून महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत उद्या त्यांच्या महाराष्ट्र दौऱ्याचा अखेरचा दिवस असून जाताना त्या नांदेड येथे तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारात दर्शन घेणार आहे.

# जगातील हुकूमशाहवर मात करण्यासाठी भारतासारखे उत्कृष्ट संविधान असायला हवे..! उत्तम तरकसे






नवी मुंबई / के.एच.हनवते :- प्रजासत्ताक अमृत महोत्सव पुरस्कार समिती महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने नॅशनल लायब्ररी सभागृह एस व्हि रोड पश्चिम बांद्रा येथील सभागृहात पुस्तक प्रकाशन व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब तोरस्कर (साहित्यिक) डॉक्टर खंडू माळवे, पद्मश्री जी डी यादव, मा. भानुदास केसरे. मा. प्रमोद महाडिक, डॉ. सुप्रत खांडेकर, मा. राजेश कांबळे, डॉक्टर नेन्सी अलबर्ग, मा. रामकृष्ण कोळकर, असे मान्यवर विचारवंत मंचावर उपस्थित होते. सदर कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य शासनाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक विचारवंत मा. श्री उत्तम दासु तरकसे (आसरडोहकर) यांच्या शाहीची नोंद या काव्यसंग्रहाला उत्कृष्ट वाङ्मयाचा साहित्यभूषण प्रजासत्ताक अमृत गौरव राज्य पुरस्कार२०२४ ने सन्मानित केले तत्पूर्वी सदरच्या काव्यसंग्रहाला वेगवेगळ्या संस्थेकडून चार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे सदर कार्यक्रमाच्या वेळी श्री उत्तम तरकसे हे आपले विचार मांडताना म्हणाले की, जगातील हुकूमशहावर मात करण्याकरिता भारतासारखे उत्कृष्ट संविधान असायला हवे असे मोलाचे विचार मांडत पुरस्कार निवड समिती समितीच्या सदस्याचे व संस्थेचे अध्यक्ष रमेश पाटील तसेच उपस्थित मान्यवर व प्रमुख पाहुणे व प्रेक्षकांचे सर्वांचे आभार मानले.

# वस्तादांच्या तालिमीत अनेकांचा प्रवेश होणार : घाटगे

कोल्हापूर : मी आपल्या सर्व कार्यकर्त्यांना विनंती करत आहे की, ही परिवर्तनाची मुहुर्तमेढ आहे. आताच कुणीही विजयाचा आनंद साजरा करु नका, पुढच्या दोन महिन्यांत आपल्याला खूप काम करायचे आहे. कागलमध्ये प्रत्येक घराघरात शरद पवारांचा विचार आपल्याला घेऊन जायचा आहे. प्रत्येक घरापर्यंत तुतारी पोहोचवायची आहे, त्यासाठी काम करा. कागलमध्ये १०० टक्के परिवर्तन होणार आहे. पक्षात किंबहुना वस्तादांच्या तालिमीत आणखी अनेकांचा प्रवेश होणार आहे, असा दावा समरजितसिंह घाटगे यांनी केला आहे. अखेर भाजपामध्ये असलेल्या समरजितसिंह घाटगे यांचा शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अधिकृतपणे प्रवेश झाला. यावेळी जमलेल्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना समरजितिंसह घाटगे म्हणाले की, शरद पवार यांनीच सांगितले की, सभा गैबी चौकात घ्या. काही जणांना वाटत होत गैबी चौकातच आपलीच सभा होईल. पण हा वस्तादांचाच गैबी चौक आहे. स्वर्गीय मंडलिक आणि घाटगे यांनी राजकीय विरोध प्रामाणिकपणे केला. त्यांचा संघर्ष प्रामाणिक राहिला आहे. त्यांनी कागलचा पुरोगामी विचार पुढे नेला तेच मी करणार. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पुढचे राजकारण करणार. या कागलच्या भूमीत परिवर्तन करणारच, असा निर्धार समरजितसिंह घाटगे यांनी बोलून दाखवला. माझ्याकडे शरद पवार आणि जनतेची ताकद मीडियाचे लोक मला विचारतात की, समोर जे कागलमधील मंत्री महोदय आहेत, जे पाच वेळा आमदार झाले आहेत, त्यांच्या बाजूने सगळे गट आहेत, त्यांच्याकडे महायुती, केंद्र, मोठमोठ्या संस्थांची ताकद आहे.

# सामाजिक न्याय, राजकीय भागीदारीसाठी लातुरात दलित, मुस्लीम, ओबीसी ऐक्य परिषद शनिवारी आयोजनः यु.डी.गायकवाड यांची माहिती

प्रतिनिधी/ लातूरः जातीयवादी, धर्मांध विचारधारेने भारताची लोकशाही, संविधान आणि धर्मनिरक्षता धोक्यात आणली असून, अशा निर्वाणीच्या परिस्थितीत बुध्दीवादींनी आवाज उठविणे काळाची गरज आहे. त्यानुसार लातूर जिल्ह्यातील पुरोगामी-परिवर्तनवादी विचारसरणीच्या मंडळींनी 'जी २४' नावाने संघटन उभे केले आहे. संघटनेच्या उद्देशानुसार संविधानातील सामाजिक न्याय आणि बहुजन समाजाला राजकीय भागीदारी मिळवून देण्यासाठी शनिवार, दि. ०७ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता येथील दयानंद सभागृहात दलित, मुस्लीम, ओबीसी ऐक्य परिषद आयोजित करण्यात आल्याची माहिती जेष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, यु.डी.गायकवाड, आणि सेवानिवृत्त न्यायाधीश आर. वाय. शेख यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली. प्रा. साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती समारोप कार्यक्रमानिमित्त आयोजित या परिषदेचे उद्घाटन जेष्ठ पत्रकार निरंजन टकले (नाशिक) यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी यु.डी. गायकवाड राहणार आहेत. यावेळी प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तीन सत्रात चालणाऱ्या कार्यक्रमात 'राजकारणाचे संघीकरण आणि ओबीसी राजकारणापुढील दिशा' विषयावर दिल्ली विद्यापिठातील प्रोफेसर रतनलाल आपले विचार मांडणार आहेत तर प्रा. सुभाष भिंगे अध्यक्षस्थानी असणार आहेत. विलास माने आणि एन.डी. राठोड प्रमुख पाहुणे राहणार आहेत. दुसऱ्या सत्रात 'मुस्लीम समाजाची राजकीय भागीदारीः भ्रम, वास्तव आणि आव्हाने' विषयावर माजी पोलीस महासंचालक अब्दुर रहेमान शेख (मुंबई) भाष्य करणार आहेत. माजी न्यायाधिश आर. वाय. शेख यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सत्रात अफजल कुरेशी, मौलाना आसिफ मुस्तफा प्रमुख पाहुणे राहणार आहेत. प्रा.डॉ. हर्षवर्धन कोल्हापूरे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या समारोपीय सत्रात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे खुले पत्र आणि दलित राजकारणाचे बदलते आयाम' विषयावर आंबेडकरी नेते श्याम दादा गायकवाड (अंबरनाथ, ठाणे) विचार मांडणार आहेत. यावेळी प्राचार्य डॉ.आर.डी. निदुरकर, अजित शिंदे आणि आर.डी. जोगदंड आदींची उपस्थिती लाभणार आहे.



कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन जी २४ चे कार्यकर्ते नरसिंग घोडके, आदिवासी नेते रामराजे आत्राम, बरकत काझी, मौलाना इब्राहिम ईसाकी, मौलाना असिफ मुस्तफा, प्रा.डॉ. अशोक नारनवरे, प्रा. अर्जुन जाधव, इंजि. श्रीधर शेवाळे, प्रा.डॉ. मारोती गायकवाड, प्रा.डॉ. निशिकांत वारभूवन, ॲड. बालाजी गाडेकर, ॲड. विजयकुमार चिखलीकर, ॲड. वसंत उगले, पद्माकर वाघमारे, ॲड. मंचकराव डोणे, ॲड. दिपक साठे, अजित निंबाळकर, प्रा. युवराज वाघमारे, पांडूरंग देडे, प्रा. बळीराम मोठेराव, दयानंद राठोड, प्रताप माने-पाटील, लक्ष्मी कांबळे, महानंदा शेवाळे, सुधाताई कांबळे आदींनी केले आहे.

.काय आहे 'जी-२४'

लोकशाही, संविधान वाचविण्यासाठी जिल्हयातील माजी कुलगुरू, माजी प्राचार्य, प्राध्यापक, वकील, इंजिनिअर, डॉक्टर्स, शिक्षक आणि सामाजिक कार्यकर्ते एकत्र येऊन 'जी-२४' ही धर्मनिरपेक्ष संघटना स्थापन केली आहे. ही संघटना अराजकीय आहे.संघटनेच्या माध्यमातून व्याख्याने, प्रबोधनपर कार्यक्रम घेऊन संविधानवादी विचारधारेची रुजवणूक केली जात आहे. लोकसभेच्या निवडणूकीत, 'जी-२४' च्या सदस्यांनी स्वखर्चाने इंडिया आघाडीच्या उमेदवाराचा प्रचार केला. असा अभिनय राजकीय प्रयोग 'जी-२४' ने लातूरात केल्याने त्याची दखल आंतराष्ट्रीय इंग्रजी वृत्तपत्रांनी घेतली होती.

अशा आहेत मागण्या

महाविकास आघाडीतील प्रमुख पक्षाकडे संघटनेने अनुसुचित जातीचा-जमातीचा निधी इतरत्र वळवू नये, अनुसुचित जाती-जमातीच्या व ओबीसींच्या विद्यार्थ्यांना नियमीत शिष्यवृत्ती द्यावी व महागाई निर्देशाकानुसार त्यात वाढ करावी, दलित-ओबीसींच्या नोकरीतील पदोन्नतीचा प्रश्न सोडवून अनुशेष भरती करावी, अनुसुचित जातीच्या राखीव जागावर सुशिक्षित जाणकार, सामाजिक बांधिलकी असलेला उमेदवार महाविकास आघाडीने द्यावा, मुस्लिम, ओबीसी समाजाला विधानसभेत यथोचीत प्रतिनिधीत्व द्यावे, मुस्लिम समाजाला आरक्षण देण्यात यावे, ओबीसींची जात जनगणना करावी, ओबीसींच्या आरक्षणाला संरक्षण देण्यात यावे, आदी मागण्या केल्या आल्या आहेत.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE